# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 24/06/2021 (गुरूवार)

(दुपार)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### एकुण 20,95,000 रूपयाचा माल जप्त

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत मोवाड चौक जलालखेडा येथे दिनांक 23/06/2021 चे 10.45 वा. ते 12.15 वा. दरम्यान जलालखेडा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन जलालखेडा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 24/ अेबी – 6739 क्रमांकाच्या आयशर ट्रक व एम. एच.– 26/ बीई – 1670 क्रमांकाच्या आयशर ट्रकला थांबवुन चेक केले असता या दोन्ही ट्रक मध्ये एकुण 38 बैल कि. 4,95,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. यापैकी 4 जनावरे मृत आरोपी नामे– 1) चंदू जमाल शेख, वय 32 वर्ष, रा. दैगलूर नाका, ईतवारा, नांदेड, 2) रिजवान युसुफ शेख, वय 26 वर्ष, रा. राम रहीम नगर, देगलुर नाका, ईतवारा नांदेड, 3) खालेद सालेह चाउस, वय 23 वर्ष, रा. नई आबादी शिवाजी नगर, नांदेड व्यवसाय– ड्रायव्हर, 4) सादिक गफुर मोहमद वय 46 वर्ष, रा. इतवारा चौक, नांदेड यांच्या ताब्यातुन वाहनासह एकुण किंमती 20,95,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई किशोर कांडेलकर, पो.स्टे. जलालखेडा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे वरील आरोपीतांविरुध्द 429 भादवी सहकलम 11 (1)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, तसेच कलम 83,177 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. हरिशचंद्र गावडे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अपर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी काटोल विभाग श्री. नागेश जाधव यांचे मार्गदर्शनात ठाणेदार सपोनि श्री हरिशचंद्र गावडे, पपोउपनि श्री घोरमाडे, पोहवा कोल्हे, पोशी किशोर कांडेलकर, चेतन राठोड, अरूण जाधव व होमगार्ड सैनीक यांनी केलेली आहे.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर